विषय :- श्री. नागरे लक्ष्मीकांत साहेबराव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना क्षयरोगामुळे वैद्यकीय रजा/सवलत मंजूर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग
आदेश. क्र.साबां/आस्था-२/ १५८ /२०२६
अहिल्यानगर दिनांक- खालील नमूद स्वाक्षरी प्रमाणे

वाचा :-१) उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग संगमनेर यांचेकडील पत्र क्र. बांध/१९०/२०२६ दिनांक १३/०२/२०२६

२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. अहिल्यानगर यांचेकडील आदेश क्र. साप्रवि.१/ रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६ अन्वये

३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम -९६

४) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३

५) उप अभियंता जि.प.सा.बा. उपविभाग संगमनेर वशि/बांध/ आस्था.४२६/२०२६ दिनांक १३/३/२०२६

ज्याअर्थी उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, संगमनेर यांचे पत्र क्र. बंध/१९०/२०२६ दिनांक १३/०२/२०२६ अन्वये श्री. नागरे लक्ष्मीकांत साहेबराव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना क्षयरोग झाल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे नियमानुसार क्षयरोग रजा/सवलत मंजूर करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व वैद्यकीय प्रमाणपत्राचा विचार केला असता, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांचे आदेश क्र. सा.प्र.वि.१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६ नुसार क्षयरोग / कर्करोग / कुष्ठरोग किंवा पक्षघात झालेल्या कर्मचाऱ्यांना सवलती मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९६ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-३ नुसार खाते प्रमुखांना त्यांच्या अधिनस्त गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत रजा मंजूर करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत.

ज्याअर्थी वरील तरतुदींच्या अनुषंगाने, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-३ मधील नियम ३(३) नुसार, शासकीय कर्मचारी याने देय व अनुज्ञेय असलेली पूर्ण वेतनाची सर्व रजा संपविल्यानंतर त्यास पूर्ण वेतनाची क्षयरोग रजा मंजूर करता येते व अशा रजेचे वेतन प्रचलित नियमांनुसार विनियमित करण्यात येते.

त्याअर्थी श्री. नागरे लक्ष्मीकांत साहेबराव यांची संदर्भ क्रमांक.०५ अन्वये खालील प्रमाणे रजा शिल्लक असल्याचे निदर्शनास येत असल्याने, त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे खालीलप्रमाणे रजा मंजूर करण्यात येत आहे

| कालावधी | रजेचा तपशिल | शिल्लक रजा | एकूण |
|---|---|---|---|
| दिनांक-२९/०१ /२०२६ ते १/३/२०२६ | अर्जित रजा | ३२ | ३२ |
| दिनांक २/३/२०२६ ते ९/३/२०२६ | वैदयकीय | ८ x २= १६ | १६ |
| दिनांक १०/३/२०२६ ते २९/३/२०२६ | असाधारण् | २० | २० |
| एकूण | | | एकूण -६८ दिवस |

उप अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग संगमनेर यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मधील ३(३) नुसार पुढील कार्यवाही करुन सदर नोंद संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश् https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असून, त्याचा संकेतांक क्रमांक 20260507130026 - असा आहे

Digitally signed by
Balasaheb Bhausaheb Nanaware
Date: 07-05-2026 12:42:12

बाळासाहेब ननवरे
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री. नागरे लक्ष्मीकांत साहेबराव, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक
व्दार व प्रत उप अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग संगमनेर

प्रत- उप अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग संगमनेर यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर यांना पुढील कार्यवाहीसाठी